# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ .)

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**
**डॉ. एस.एम. रोकडे**
संचालक (प्रभारी)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२ फॅक्स क्र ०७१३२.२२३३२२
Email : bcud.gondwanauniversity@gmail.com
web: gondwana.digitaluniversity.ac
web:unigug.org

जा.क्र/गो.वि./बि.सी.यु.डी/ 1468 /२०१६.

दिनांक :३०/०५/२०१६.

## परिपत्रक

**विषयः–** गोंडवाना विद्यापीठातुन पुणे येथे RUSA कार्यक्रमाकरिता आदिवासी दोन विद्यार्थीनी व एक महिला साहाय्यक प्राध्यापक पाठविण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान हि एकछत्री योजना देशभरात लागू केली आहे. या योजनेचा प्रमुख उद्देश राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता सुधार करणे हा आहे. या योजनेची अमंलबजावणी करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्याने घेतला आहे. या योजनेअंतर्गत १८ विविध उद्दिष्टे असून त्या उद्दिष्टाअंतर्गत या योजनेमधून निधी संबंधित संस्थांना मंजूर करण्यात येतो. या भौतिक सुविधा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून प्रयोगशाळांचे बळगटीकरण, संगणक प्रयोगशाळा निर्मिती, विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह नुतनीकरण, ग्रंथालय पुस्तके व ई–सुविधा, इ–कंटेन्ट लर्नींग मोडयुल आणि डिजिटल क्लासरुम इत्यादी कामे संस्था स्तरावर करण्यात येतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत डिजिटल क्लासरुम करिता निधी मिळाला असून याचे उद्घाटन श्रीमती स्मृती इराणी, मंत्री केंद्रीय मनुष्यबळ विकास, नवी दिल्ली मधून व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे दि. ०३ जून २०१६ रोजी सकाळी १.०० ते १.३० या दरम्यान होणार आहे.

दि. ३१/०५/२०१६ रोजी मा. उपसचिव (डॉ जगताब, महाराष्ट्र शासन) यांचे कडून प्राप्त झालेल्या ई–मेल नुसार गोंडवाना विद्यापीठातुन व संलग्नीत महाविद्यालयात शिकणाऱ्या आदिवासी मुली पैकी किमान ०२ आदिवासी मुली उपरोक्त कार्यक्रमात संवाद साधन्याकरिता पाठविण्याची विनंती केलेली आहे. त्यांचा जाण्या–येण्याचा व राहण्याचा खर्च रुसा, पूणे करणार आहे.

सद्यास्थितीत ०२ आदिवासी मुली व ०१ महिला साहाय्यक प्राध्यापक उपरोक्त कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी पाठविणे अत्यंत आवश्यक असून विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील दोन मुली व त्याच्या सोबत एक महिला साहाय्यक प्राध्यापक यांची नावे मा. संचालक, बि.सी.यु.डी., गोंडवाना विद्यापीठ यांचेकडे तातडीने दि. ३१/०५/२०१६ सायं. ५.३० वा. पर्यंत सुचविण्यात यावी.

संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)